वाचा :- १) वित्त विभाग शासन निर्णय क्र. अंनियो-२०१५/(NPS)/प्र.क्र.३२/सेवा-४, दि. ०६/०४/२०१५.
२) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र :अंनियो-२०१७/प्र.क्र.२८/सेवा-४, दि. २८/०७/२०१७.
३) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे यांचे दि. ३०/११/२०१७ रोजीचे पत्र.

---

क्र.स्था-१८/ब/एनपीएस वार्षिक विवरण/लेखा-४/ ४४

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, कोकण भवन,
६ वा मजला, नवी मुंबई - ४०० ६१४
दिनांक :- 04 JAN 2018

# परिपत्रक

उपरोक्त वाचा अन्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या वार्षिक विवरण पत्रातील मिसींग क्रेडीट व स्तर-२ च्या रक्कमा स्तर-१ मध्ये वर्गीकृत झाले असल्यास त्यांच्या दुरूस्तीबाबतची कार्यपध्दती वाचा क्र. १ च्या शासन निर्णयामध्ये विषद केलेली आहे.

कर्मचाऱ्यास मिळणाऱ्या वार्षिक विवरणपत्रात (आर-३) जमा असलेल्या रक्कमांबाबत काही त्रुटी असल्यास जसे कर्मचाऱ्यांच्या वेतनातून अंशदानाच्या रक्कमा गहाळ असणे, जमा रक्कमेच्या वार्षिक विवरणपत्रात त्रुटी असणे. सुरूवातीची शिल्लक व अखेरची शिल्लक न जुळणे, शासनाचे अंशदान विवरण पत्रात जमा नसणे, व्याजाची रक्कम कमी मिळणे याबाबत अधिकारी/ कर्मचारी यांनी स्वत:चे आर-३ विवरणपत्राचे स्वत: अवलोकन करून दुरूस्ती असल्यास कार्यालयाचे त्वरीत निदर्शनास आणून द्यावे. जेणेकरून वार्षिक विवरणपत्रातील दुरूस्ती करून घेणे कार्यालयास शक्य होईल.

( शिल्पा खळे )
सहाय्यक संचालक (प्रशासन),
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
नवी मुंबई.



C:\Users\Public\Aasthapana\T.A.Bill\TA Letter.docx